गावठाण विस्तार योजनेचा आढावा व बदल सुचविण्यासाठी समितीची नियुक्ती.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांक-गावठाण-१०-०२/प्र.क्र.१६३/र-१२
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक :- २३ जुलै, २००२

**शासन निर्णय :-**

"गावठाण विस्तार" ही योजना महाराष्ट्रात १९६१ सालापासून चालू आहे. सद्य:स्थितीत ही योजना जिल्हा पातळीवरील योजना म्हणून राबविण्यात येते व दरवर्षी सर्व जिल्हा नियोजन व विकास महामंडळांकडून सुमारे दिड ते दोन कोटी रुपयांची तरतूद यासाठी होत असते. ही योजना अत्यंत उपयुक्त असली तरी या योजनेकडे ज्या प्रमाणात जिल्हा पातळीवर लक्ष द्यायला हवे तेवढे दिले गेलेले दिसत नाही. त्या योजनेचे जे निकष विहित करण्यात आले होते तेच निकष अजूनही चालू आहे. विशेष करुन गावठाण विस्तार होत असतांना त्यात जमीन वापरण्याचे नियोजन (Land use Planning) ही संकल्पना यात अंतर्भूत झालेली दिसत नाही.

या योजनेचा सर्वंकष आढावा घेवून सध्याच्या परिस्थितीस अनुरुप अशी योजना तयार करण्यासाठी पुढील अधिकाऱ्यांची एक समिती नियुक्त करण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे. समितीने दोन महिन्याचे आत आपला अहवाल सादर करावा.

| | | |
|---|---|---|
| (१) | प्रधान सचिव (मदत व पुनर्वसन)- | अध्यक्ष |
| (२) | विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभाग- | सदस्य |
| (३) | संचालक, नगर रचना, पुणे- | सदस्य |
| (४) | जिल्हाधिकारी, अहमदनगर- | सदस्य |
| (५) | जिल्हाधिकारी, वर्धा - | सदस्य |
| (६) | जिल्हाधिकारी, औरंगाबाद- | सदस्य |
| (७) | सहसचिव/उपसचिव (पुनर्वसन)- | सदस्य सचिव |

३६०४

जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी.
१४ AUG 2002
प्र. लि. नि. उ. जि. जिल्हाधिकारी

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( द. शि. फाटक )
कार्यासन अधिकारी
महसूल व वन विभाग

प्रत :- १. मा. राज्यपाल यांचे सचिव